दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १२५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.७ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# चंद्रपूरच्या माता महाकाली यात्रे साठी द्यावा १ कोटी रुपयांचा निधी!

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

## विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या दालनात भेट घेऊन केली चर्चा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील ऐतिहासिक आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री माता महाकाली मंदिरात दरवर्षी चैत्र महिन्यात भव्य यात्रा भरते. विदर्भातील अष्टक त्रीपिठांपैकी एक असलेल्या या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रावर महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, मराठवाडा आणि इतर राज्यांतून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. चंद्रपूर जिल्ह्याचे सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाचे प्रतीक असलेल्या या यात्रेत लाखो भाविकांना उत्तम सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली. विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या दालनात आ.मुनगंटीवार यांनी त्यांची भेट घेऊन यात्रेसंदर्भात सविस्तर चर्चा केली.

या यात्रेमध्ये लाखो भाविक सहभागी होतात. भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. याचा विचार करता यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी आणि भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १ कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. हा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून देण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली.यात्रेदरम्यान फक्त १५ ते २० दिवसांत सुमारे १० लाख भाविक येथे येतात. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी तात्पुरती निवासव्यवस्था, आरोग्य सुविधा, स्वच्छता, शौचालये, विद्युत रोषणाई, वाहनतळ, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी व इतर आवश्यक बाबींच्या उपलब्धतेसाठी भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत,यासंदर्भात आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेत सविस्तर चर्चा केली.



### मुख्यमंत्र्यांनी दिले आश्वासन

**चंद्रपूरच्या माता महाकाली यात्रेसाठी राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयी–सुविधांसाठी १ कोटी निधी मंजूर करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा व सुविधांची गरज लक्षात घेता, निधी मंजूर करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले असून त्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार मानतो, असे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.**

### यात्रेकरूंच्या सोयीसुविधांसाठी

**भाविकांसाठी स्नानगृह उभारावे. त्या ठिकाणी चार ट्युबवेल पंप कार्यान्वित करावे. महानगरपालिकेने गेट दुरुस्ती, झरपट नदी परिसरातील कचऱ्याची साफसफाई, गायमुख दुरुस्ती, बंधारा बांधकाम, चार ट्यूबवेल्स व फवारे बसवावेत तसेच अंचलेश्वर मंदिर येथे टाइल्स लावण्याचे कार्य हाती घ्यावे, अशा सूचनाही आ. मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**

### झरपट नदीचे पावित्र्य राखण्यासाठी आ.मुनगंटीवार यांचा पुढाकार

**चंद्रपुरातील महाकाली यात्रा ३ एप्रिलपासून सुरू होत आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर पवित्र तीर्थ म्हणून झरपट नदीचे महत्त्व आहे. परंतु सध्या तिची अवस्था अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे नदीचे खोलीकरण, सौंदर्यीकरण आणि पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक आहे, याकडे नागरिकांच्या मागणीनुसार आ. श्री. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले आणि त्यासंदर्भात तातडीने काम करण्याचे निर्देश काही दिवसांपूर्वी दिले.**

# कोरोना काळात बंद झालेली काजीपेठ रेल्वेगाडी पुन्हा सुरू!

## आमदार देवराव भोंगळे यांच्या मागणीला यश

**राजुरा । प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या काळात प्रवाशांच्या कमतरतेमुळे बंद करण्यात आलेली काजीपेठ–बल्लारशा–काजीपेठ ही पॅसेंजर रेल्वे गाडी पुन्हा सुरू करण्यात आली आहे. राजुरा विधानसभेचे आमदार श्री. देवराव भोंगळे यांची मागणी लक्षात घेऊन आजपासून ही गाडी प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.



ही रेल्वेगाडी काजीपेठ बल्लारशा काजीपेठ अशी धावणार असून, ती रात्री १० वाजता काजीपेठ येथून सुटेल आणि पहाटे ३ वाजता बल्लारशा रेल्वे स्थानकावर पोहोचेल. या गाडीला १५ थांबे असून गाडीचा क्रमांक १७०३५ असा राहणार आहे. यासोबतच बल्लारशा स्थानकावरून परत काजीपेठकडे वापस जाणारी गाडी पहाटे ४ वाजता सुटून रात्री ९ वाजता काजीपेठ रेल्वे स्थानकावर पोहोचेल आणि या गाडीचा क्रमांक १७०३६ असा राहणार आहे, अशी माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे. ही रेल्वे गाडी सुरू झाल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून महाराष्ट्रातून तेलंगणाकडे जाणाऱ्या प्रवाशांना सोईचे झाले आहे. या प्रवाशी हिताच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन जनमागणी पुर्ण केल्याबद्दल भाजपा राजुरा तालुकाचे सचिव प्रदीप पाला यांनी प्रवाशांच्या वतीने आमदार देवराव भोंगळे यांचे आभार मानले आहेत.

# एफआरपीसाठी ४ टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा करा–शेतकरी नेते राजू शेट्टी

**पुणे (वृत्तसंस्था)**–देशातील साखर कारखाने उत्पादित झालेल्या साखरेवर १० ते १४ टक्के व्याजदराने मालतारण कर्ज काढून उस उत्पादक शेतक–यांची एफ. आर. पी. ची रक्कम अदा करतात. यामुळे कारखान्यांवर पडणा–या व्याजाचा भुर्दंड कमी करण्यासाठी केंद्र सरकारने नाबार्ड अथवा एनसीडीसी मार्फत ४ टक्के व्याजदराने कर्जपुरवठा करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचेकडे केली.



साखर कारखान्यांच्या उत्पादन खर्चामध्ये व्याजाचा भुर्दंड भरमसाठ पडू लागल्याने साखर कारखान्यांच्या उत्पादन खर्चावर विपरीत परिणाम होवू लागले आहेत.साखर कारखाने आर्थिक आरिष्टातून बाहेर काढून कारखानदारी स्थिर राहण्यासाठी केंद्र सरकारने साखर कारखान्यांना एनसीडीसी अथवा नाबार्ड यांचेमार्फत कमीत कमी ४ टक्के व्याजाने मालतारण कर्जपुरवठा करण्याची गरज आहे. वास्तविक पाहता केंद्र सरकारला साखर कारखानदारीच्या माध्यमातून साखर व उपपदार्थातून मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या सर्वाधिक जीएसटी गोळा केला जात असल्याचे राजू शेट्टी यांनी निदर्शनास आणून दिले.यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सकारात्मकता दर्शवित नाबार्डच्या माध्यमातून कशा पध्दतीने साखर कारखानदारांना मदत करता येईल याबाबत अहवाल सादर करण्याबाबत संबधित नाबार्डच्या अधिका–यांना निर्देशीत केले. त्याबरोबरच साखर कारखान्यांना दिल्या जाणा–या मालतारण कर्जाची परतफेडीची १०० टक्के हमी असल्याने हा निर्णय झाल्यास साखर कारखानदार व उस उत्पादक शेतक–यांना याचा लाभ होणार असल्याचे सांगितले. यावेळी उत्तरप्रदेश विधानसभेचे आमदार व एम. एस. पी गॅरंटी किसान मोर्चाचे समन्वयक सरदार व्ही एम. सिंग उपस्थित होते.

# उद्योगांना अडथळा आणणाऱ्यांवर थेट मोक्का–मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील उद्योगधंद्यांना अडथळा आणणाऱ्यांना थेट मोक्का लावण्यात येईल, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.टीव्ही ९ कॉनक्लेव्हमध्ये बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, उद्योग महाराष्ट्राबाहेर जात असल्याचा आरोप निराधार आहे. तसेच, २०३० पर्यंत महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होणार असून, हे लक्ष्य २०२८ पर्यंत गाठण्याचा प्रयत्न केला जाईल.

कोरोनामुळे दोन वर्षे आर्थिक झळ बसली, तरी महाराष्ट्र वेगाने प्रगती करत आहे, असेही फडणवीस



यांनी स्पष्ट केले. टीव्ही ९ मराठीचे व्यवस्थापकीय संपादक उमेश कुमावत आणि टीव्ही ९ भारतवर्षचे डिप्टी एग्जिक्युटिव्ह प्रोड्यूसर गौरव अग्रवाल यांनी त्यांची मुलाखत घेतली.

# एप्रिलमध्ये नगरच्या विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील विळद येथे होणाऱ्या नवीन विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन एप्रिल महिन्यात उद्योग मंत्री उदय सामंत आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.



आज मंत्रालयात उद्योग मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीत या भूमिपूजनाबाबत चर्चा झाली. या बैठकीस पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार काशिनाथ दाते, डॉ. सुजय विखे पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि कामगार विभागाचे अधिकारी तसेच पारनेर तालुक्यातील प्रतिनिधी गणेश शेळके, सुजित झावरे, विजू आवटी, राहुल शिंदे, सचिन वरात आदी उपस्थित होते.

बैठकीत सुपा एमआयडीसीतील उद्योजकांच्या समस्या, वन विंडो सिस्टीम अंतर्गत सुलभ प्रक्रिया, तसेच एमआयडीसीच्या डेप्युटी सीईओ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत निर्णय घेण्यात आला.उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नगर जिल्ह्यातील शिर्डी, श्रीगोंदा आणि नवीन नगर एमआयडीसीमध्ये अधिक उद्योगधंदे आणण्याचे आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचे आश्वासन दिले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी नवीन उद्योगांनी प्रयत्न करावेत, अशी विनंती केली.बैठकीदरम्यान काशिनाथ दाते यांनी आभार मानले, तर एप्रिलमध्ये पुढील बैठकीत उद्योगवाढीच्या अनुषंगाने आढावा घेतला जाईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

# अजित पवारांकडे धनंजय मुंडेंच्या खात्याचा अतिरिक्त पदभार कारभार केव्हापर्यंत सांभाळणार अन् नंतर कुणाकडे सोपवणार?

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडमुळे अडचणी आलेल्या धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यामुळे त्यांच्या जागी आता कोणाला संधी मिळणार? अशा चर्चा सुरू झाल्या असतानाच मुंडेंच्या खात्याचा कारभार अजित पवारांनी आपल्याकडे घेतला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचा कारभार आपल्याकडे घेतला आहे.सोमवारी संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर एकच संतापाची लाट उसळली आहे. यानंतर अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण हे खाते होते. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याकडील खात्याचा पदभार कोणाकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाला होता.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर हा विभाग रिक्त होता. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशनात या खात्याशी संबंधित प्रश्न सभागृहात विचारले जाऊ शकतात. त्यामुळे अजित पवार यांनी तूर्तास या खात्याचा कार्यभार स्वत:कडे घेतला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विभागासंबंधीच्या प्रश्नांना आता ते उत्तर देतील. मात्र, अजित पवार हा अतिरिक्त कार्यभार कधीपर्यंत सांभाळणार आणि हे खाते राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याच्या पदरात टाकणार,याविषयी अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचालींना वेग आला आहे. धनंजय मुंडेंच्या जागी आता छगन भुजबळांची सरकारमध्ये एन्ट्री होणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. त्यांच्याकडे दांडगा अनुभव आहे, त्यामुळे आता धनंजय मुंडे यांच्या जागी छगन भुजबळ सक्षम पर्याय आहेत, असे म्हटले जात आहे. तर दुसरीकडे धनंजय मुंडेंच्या जागी बीडमधील आमदारालाच मंत्रिपद देण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. प्रकाश सोळंके आणि विजयसिंह पंडित यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हा मुख्य मास्टरमाइंड असल्याचा दावा सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्र केला आहे. वाल्मीक कराड माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय मानला जातो. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. पण सरकारने राजीनामा घेतला नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करतानाचे धक्कादायक फोटो समोर आले. सैतानालाही लाजवेल अशा प्रकारे संतोष देशमुख यांची हत्या केल्याचे या फोटोंमधून दिसून आले. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे सरकारला भाग होते. त्यांनी तो घेतला.



# सेवा,संस्कृती आणि समर्पण-युवा शक्तीचा समाजासाठी आदर्श उपक्रम









**वरोरा (आशिष घुमे): समाजसेवा ही केवळ राजकीय संघटनांपुरती मर्यादित राहिली पाहिजे, असे नाही. निःस्वार्थ सेवा करण्यासाठी कोणत्याही पदवीची किंवा मोठ्या संघटना व विशेष ओळखीची गरज नसते-फक्त इच्छाशक्ती आणि कृतिशीलता आवश्यक असते. हीच प्रेरणा घेऊन काही तरुण एकत्र आले आणि समाजसेवेच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले. हिंदू संस्कृतीच्या मूल्यांचे रक्षण करणे, गोरक्षण करणे, पर्यावरण संवर्धन करणे, गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहणे आणि सामाजिक एकता मजबूत करणे हे या तरुणांचा उद्देश आहे.गाय हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, आज अनेक ठिकाणी गाईंची दुर्दशा होताना दिसते. या युवकांनी गाईंच्या संरक्षणासाठी गोरक्षण केंद्रांना मदत करणे, जखमी व असहाय्य गाई तसेच कुत्रा, मांजर, साप आणि वन्यप्राण्यांना योग्य उपचार मिळवून देणे, त्यांना निवारा उपलब्ध करून देणे आणि जनजागृती मोहिमा राबवणे असे उपक्रम सुरू केले आहेत. समाजात गोरक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.**

निसर्ग आणि पर्यावरण जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. याच विचाराने प्रेरित होऊन या युवकांनी वृक्षारोपण, जखमी प्राण्यांना मदत, त्यांचे पुनर्वसन तसेच स्वच्छता अभियान राबवण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक गावांमध्ये व शहरी भागात स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण झाली आहे.

शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा प्रत्येकाला सहज उपलब्ध झाल्या पाहिजेत. अनेक गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी हे युवक विशेष प्रयत्न करीत आहेत. तसेच, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करून समाजातील आरोग्यविषयक समस्यांकडे लक्ष वेधण्याचे कार्य ते करत आहेत.हिंदू संस्कृती ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक बंधुभावाचे प्रतीक आहे. परंपरांचे जतन करत नव्या पिढीपर्यंत त्या पोहोचवणे, सण-उत्सव एकत्र येऊन भव्य स्वरूपात साजरे करणे तसेच धार्मिक स्थळांचे देखावे सादर करणे यावर हा युवा गट भर देत आहे. समाजातील एकता वाढवण्यासाठी ते विशेष प्रयत्नशील आहेत. इतिहासाची जाण निर्माण व्हावी आणि शिस्त वाढावी यासाठी गडकिल्ल्यांवर आयोजित मोहिमांमध्येही हे युवक सक्रिय सहभाग घेतात.या गटातील प्रत्येक सदस्य आपापल्या परीने समाजाच्या भल्यासाठी कार्य करत आहे. सतीश निर्बाण, विजय जुनघरे, आकाश काकडे, कृष्णा चौरसिया, बंटी खडके, ईश्वर ठाकरे, अविनाश मांदाळे, राकेश जेऊरकर, शुभम गोल्हार, शुभम पर्बत आणि चेतन जीवतोडे हे सर्व युवक समाजासाठी काहीतरी चांगले करण्याच्या इच्छेने प्रेरित आहेत. विशेषतः प्राणी प्रेमाबद्दल त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे.हे युवक भविष्यात नवीन गोरक्षण केंद्रांची स्थापना, गरीब विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, मोठ्या प्रमाणावर स्वच्छता आणि वृक्षारोपण उपक्रम राबवण्याचा निर्धार केला आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी ते आपले योगदान पुढेही देत राहणार आहेत.कुठलीही संस्था किंवा आर्थिक पाठबळ नसतानाही केवळ सेवा, संस्कृती आणि समर्पण या मूल्यांवर उभा असलेला हा युवा गट समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यातून समाजसेवा ही केवळ एक जबाबदारी नसून, ती एक जीवनशैली कशी असू शकते, याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.त्यांच्या सामाजिक बांधिलकीला आणि कार्याला सलाम!







## बौद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या मागण्या त्वरित मंजूर करा

### रिपाई (आठवले) पक्षाचे तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बौद्धगया येथील महाबोधी महाविहार हा बौद्ध बांधवांचा पवित्र धार्मिक वारसा आहे. या महाविहाराच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या १९४९ च्या व्यवस्थापन कायद्यात (-र्लीं) तात्काळ सुधारणा करून महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या सर्व मागण्या मंजूर करण्यात याव्यात, या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशांत मुन (जिल्हा संघटक, अमरावती) यांच्या नेतृत्वात धामणगाव रेल्वे तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.

जगभरातील तसेच देशभरातील बौद्ध बांधवांच्या धार्मिक भावना व श्रद्धेचा विचार करून १९४९ च्या कायद्यात दुरुस्ती करावी व महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.यावेळी प्रशांत मुन, रवि उर्फ दादू मेश्राम, प्रेम मोटघरे, राजिक बेग, सौ. वनिता नाईक, अल्पेश बनसोड, दिनेश बोबडे, राजेंद्र भरोसे, कोहिनूर श्रीरामे, संदीप रामटेके, राजू सावध, श्याम उर्फ बाळासाहेब तुपसुंदरे, अक्षय अर्जुने, अशोक संसारे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.






## दहावीच्या उर्वरित पेपरसाठी कठोर दक्षतेचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**माळशिरस । प्रतिनिधी**

दहावी व बारावीच्या उर्वरित परीक्षांसाठी मास कॉपी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व अधिकारी दक्ष राहावेत, असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले.

दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्यांनी संवेदनशील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. कॉपीच्या तक्रारी आढळल्यास पर्यवेक्षक निलंबन आणि परीक्षा केंद्रावर बंदीची कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



### संवेदनशील केंद्रांवर कठोर कारवाई

**सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, माळशिरस आणि पंढरपूर तालुक्यातील काही केंद्रांवर कॉपीच्या तक्रारी आल्या असून, कंट्रोल रूममार्फत कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.**

### पंढरपूरमध्ये दोघे निलंबित

**पंढरपूर तालुक्यातील नांदुरे येथील स्टार इंग्लिश स्कूलमध्ये फळ्यावर प्रश्नांची उत्तरे लिहिल्याचा प्रकार उघड झाला. याप्रकरणी पर्यवेक्षक अमोल पवार आणि श्रीमती निपारे यांना तत्काळ निलंबित करण्यात आले, अशी माहिती शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.**

## यवतमध्ये चड्डी-बनियन गँगचा हल्ला; एक ठार,तिघे गंभीर जखमी

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील यवत येथे बुधवारी रात्री चड्डी-बनियन गँगने कुटुंबावर हल्ला केला. या हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले.बुधवारी रात्री १०:४५ वाजता तीन अज्ञात हल्लेखोरांनी रेल्वे स्टेशन रोडजवळील शेतातील एका घरात प्रवेश करून धारदार शस्त्रांनी चव्हाण कुटुंबावर हल्ला केला. या हल्ल्यात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर तीन सदस्य गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर लोणी काळभोर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.हा हल्ला चोरीच्या उद्देशाने झाला की जमिनीच्या वादातून, याचा पोलीस तपास करत आहेत. चव्हाण कुटुंबीयांनी जमिनीच्या वादातून हल्ला झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. घटनेनंतर पुणे ग्रामीण पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, आरोपींचा शोध सुरू आहे. यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी सुरक्षेची कडक व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



## चाटोरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नव्या इमारतीच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

### दोषींवर कारवाईची मागणी

**गंगाखेड । प्रतिनिधी**

मौ. चाटोरी (ता. पालम, जि. परभणी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची नवी इमारत निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी सातत्याने करण्यात येत असून, यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

सदर बांधकाम गुणवत्ताहीन असून, कंत्राटदार व संबंधित अभियंता यांना दोषी धरून त्यांच्या निधीतून दुरुस्तीचा खर्च करण्यात यावा आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात सार्वजनिक आरोग्य मंत्री ना. डॉ. तानाजी सावंत, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आणि खासदार चंद्रकांत हंडोरे यांना निवेदन पाठवण्यात आले आहे. मात्र, अद्याप कंत्राटदार व अभियंत्यांवर कोणतीही नोटीस किंवा कारवाई झालेली नाही. यासंबंधी त्वरित चौकशी करून कार्यवाही न झाल्यास भिमशक्ती संघटनेचे अभिनंदन मस्के यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक नागरिकांकडून या प्रकरणी लवकरात लवकर कठोर कारवाईची मागणी होत आहे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.



## ॲड.कृष्णा पुंडलिकराव जाधव यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार

**वैजापूर । प्रतिनिधी**

कृष्णा पुंडलिकराव जाधव यांना त्यांच्या सामाजिक, सहकारी आणि विधी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



ड. कृष्णा जाधव हे कन्नड तालुका वकील संघाचे अध्यक्ष, तसेच विश्वकर्मा नागरी सहकारी बँक, छत्रपती संभाजीनगरचे चेअरमन आहेत. याशिवाय ते माजी व्हाईस चेअरमन (श्री. हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना, पिशोर), माजी संचालक (कन्नड सहकारी साखर कारखाना), माजी सदस्य (प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, मराठवाडा), कार्याध्यक्ष (महाराष्ट्र राज्य शेतकरी व कामगार महासंघ), संचालक (विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पिशोर), उपाध्यक्ष (शालेय समिती, न्यू हायस्कूल, कन्नड), उपाध्यक्ष (माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, नाशिक, शाखा - कन्नड) अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळत आहेत.त्यांच्या सन्मानामुळे त्यांच्या संघटनेच्या वतीने तसेच विविध शाखा प्रमुखांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अमेरिकेत स्थायिक मेघा जागंडा यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## जल,जीवन आणि पर्यावरण संवर्धनाची गरज; सुभाष उच्च प्राथमिक शाळेत संवाद

**मूल । रोहीत कामडे**

भारतात पाण्याची मुबलकता असल्याने त्याचे महत्त्व सर्वसामान्यांना कमी जाणवते, मात्र भविष्यात योग्य नियोजन न केल्यास मोठे जलसंकट निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन अमेरिकेत स्थायिक झालेल्या मेघा हरीश जागंडा यांनी केले. मूल येथे मराठी शाळेत शिक्षण घेतलेल्या आणि सध्या अमेरिका निवासी असलेल्या मेघा जागंडा यांनी सुभाष उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधून जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जबाबदारीपूर्वक पाणी वापराचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी मेघा जागंडा यांनी अमेरिकेतील आणि भारतातील जलस्रोत व्यवस्थापनातील फरक उलगडून सांगितला. त्या म्हणाल्या, अमेरिकेत रस्ते व नाल्यांमध्ये पावसाचे पाणी मुरण्यासाठी जागा ठेवली जाते, मात्र भारतात सर्वत्र सिमेंटचे बांधकाम झाल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचा मार्गच राहिलेला नाही.त्यामुळे निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची आवश्यकता आहे.

त्या पुढे म्हणाल्या, आपल्याकडे पाणी मुबलक प्रमाणात आहे, मात्र त्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होतो. कपडे धुणे, भांडी घासणे, घर साफ करताना अनावश्यक पाणी वाया जाते. विद्यार्थ्यांनी स्वतःपासून सुरुवात करून आपल्या आई-वडिलांनाही पाणी बचतीचे महत्त्व पटवून द्यावे.मेघा जागंडा यांनी जल है तो कल है या उक्तीचा उल्लेख करत, प्रत्येकाने झाडे लावण्यावर भर द्यावा आणि पर्यावरण संवर्धनासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले.आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांमुळेच आपण घडलो, त्याचा उपयोग समाजातील विद्यार्थ्यांना व्हावा, या हेतूने ‘शोभा वसंत फाउंडेशन’च्या माध्यमातून मार्गदर्शन सुरू केल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अविनाश जगताप होते. यावेळी पदवीधर शिक्षक राजू गेडाम, सहाय्यक शिक्षक बंडू अल्लीवर, योगेश पुल्लकवार, राहुल मुंगमोडे, अजय राऊत, रिना मसराम, संध्या आभारे, निखिता पोहणे, संकेत जाधव आदी शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन बंडू अल्लीवर यांनी केले तर आभार योगेश पुल्लकवार यांनी मानले.पर्यावरण वाचवायचे असेल तर पाणी वाचवले पाहिजे, ही जबाबदारी प्रत्येकाची आहे, असा संदेश देत मेघा जागंडा यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचे आवाहन केले.



# खा.धानोरकर यांच्या हस्ते वनोजा ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण

## गावाच्या विकासासाठी सदैव तत्पर राहण्याचे आश्वासन

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील वनोजा ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण बुधवार, दि. ५ मार्च रोजी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शालूबाई उताणे होत्या, तर उद्घाटन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक चंद्रपूर वसंतराव विधाते, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनंदाबाई जिवतोडे, पंचायत समितीच्या माजी उपसभापती संजीवनी भोयर उपस्थित होते.




ग्रामपंचायत भवन लोकार्पण सोहळ्यास ग्रामपंचायत सचिव घारगे, उपसरपंच सचिन बुरडकर, सदस्य आकाश उताणे, प्रवीण परचाके, अंजू लांडे, शीतल गमे, अनिता झाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदासपाटील कष्टी, पत्रकार आशिष घुमे यांची उपस्थिती होती.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध राहू, असे आश्वासन खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिले. गावातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक उपाययोजनांसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ग्रामपंचायत भवन लोकार्पण सोहळ्यात ग्रामपंचायत सचिव सचिन घारगे यांनी गावाच्या विकासाचा आराखडा वाचून दाखविला, तर वसंतराव विधाते यांनी आपल्या मनोगतातून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे संचालन जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा उमरे यांनी केले, तर आभार उपसरपंच सचिन बुरडकर यांनी मानले.यावेळी महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर समस्त ग्रामस्थांसाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले.

# स्व.आप्पाजी जोशी सेवान्यास हिंगणघाट जिल्हा वर्धा अंतर्गत नि:शुल्क रक्त तपासणी शिबिराचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, हिंगणघाट द्वारा संचालित माधव कॉन्व्हेंट, हिंगणघाट येथे वर्ग ५ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी स्व. आप्पाजी जोशी सेवान्यास, हिंगणघाट जिल्हा वर्धा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोककल्याण समिती, नागपूर यांच्या वतीने निशुल्क रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमेश धारकर (सचिव, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, हिंगणघाट) होते. प्रमुख अतिथी म्हणून जेठानंद राजपूत (जिल्हा संघचालक, वर्धा), सुधीर वानखेडे (प्रधानाचार्य, माधव कॉन्व्हेंट), सुधीर सुपारे (उपप्रधानाचार्य), स्मिता कुसे (प्रशासकीय अधिकारी), पवन बावनकुळे (लोककल्याण समिती, नागपूर) व त्रिशूल लोंढेकर (जिल्हा सहकार्यवाह) उपस्थित होते.




कार्यक्रमाचे संचालन कुणाल झोडे यांनी केले, तर प्रास्ताविक त्रिशूल लोंढेकर यांनी केले. पवन बावनकुळे यांनी CBC, Sickle Cell Anemia, Thalassemia यासारख्या आजारांबद्दल सखोल माहिती दिली व लसीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.अध्यक्षीय भाषणात रमेश धारकर यांनी स्व. आप्पाजी जोशी यांच्या संघकार्य व सेवाकार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत विद्यार्थ्यांनी मैदानी खेळात सहभागी होण्याचे महत्त्व सांगितले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्त विविध सेवा कार्य समाजापर्यंत पोहोचवण्याच्या उपक्रमाची माहिती दिली.शिबिराची सुरुवात रमेश धारकर व जेठानंद राजपूत यांनी स्वतः रक्त तपासणी करून केली. लोककल्याण डायग्नोस्टिक्स तर्फे प्रोजेक्ट सुश्रुता अंतर्गत १३९ विद्यार्थ्यांची निशुल्क रक्त तपासणी करण्यात आली.या शिबिराकरिता नागपूर वरून आलेले लॅब टेक्निशियन पूनम बोरकर, पायल मालाधरी व शिवकुमार वर्मा यांनी सहकार्य केले.शाळेच्या व संस्थेच्या वतीने सर्व मान्यवरांचे, लॅब टेक्निशियनचे व सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचे कौतुक व आभार व्यक्त करण्यात आले.

# संजीवनी इंग्लिश मिडियमचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**कोपरगाव । प्रतिनिधी**

संजीवनी इंग्लिश मिडीयम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन 'संघर्षगाथा' या महिलांच्या जीवनावर आधारित थीमसह मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी पौराणिक ते आधुनिक काळातील महिलांच्या संघर्षाची प्रेरणादायी सादरीकरणे सादर केली.

कार्यक्रमास संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, नाशिक जि.प. सदस्य अमृता पवार, संस्थेचे चेअरमन विवेक कोल्हे, संस्थेचे विश्वस्त सुमित कोल्हे, शाळेच्या मॅनेजिंग ट्रस्टी रेणुका कोल्हे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सह.साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन राजेंद्र कोळपे, संचालक बाळासाहेब वक्ते, रमेश घोडेराव, संजयराव होन, मोनिका संधान, माजी सभापती वैशाली साळुंखे यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




रेणुका कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक प्रगतीची घोडदौड सुरू ठेवली असून, नाविन्यपूर्ण उपक्रम व शंभर टक्के निकालाची परंपरा राखली जात आहे, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक मोहसीन शेख व शिक्षक-वर्गाने केले. संजीवनी इंग्लिश मिडीयम हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाचा आदर्श ठरत आहे, असे अमृता पवार यांनी नमूद केले.

# सोलापूर 'कॉपी मुक्त' अभियानाच्या यशाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन

**मोहोळ । प्रतिनिधी**




सोलापूर जिल्ह्यात इयत्ता दहावी व बारावी परीक्षांसाठी यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या 'कॉपी मुक्त' अभियानाबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी पत्राद्वारे अभिनंदन केले आहे.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या '१०० दिवसांचा कृती आराखडा' कार्यक्रमांतर्गत शिक्षण मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबवले जात आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा प्रभावी वापर, ऑनलाइन निरीक्षणासाठी झूम व मिटचा प्रयोग आणि शाळांमध्ये कडक नियंत्रण ठेवत सोलापूर जिल्ह्याने आदर्श निर्माण केला आहे.गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय मिळावा व शिक्षणातील चुकीच्या पद्धतींना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे पाटील यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे सोलापूर जिल्हा राज्यभर चर्चेत आला असून, जिल्हाधिकारी आशिर्वाद यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले आहे.

# मुंबईत मराठी शिकणे गरजेचे नाही? भैय्याजी जोशींच्या वक्तव्याने वाद

**फमुंबई । प्रतिनिधी**

मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकणे गरजेचे नाही, असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैय्याजी जोशी यांनी केले आहे. तसेच घाटकोपरची भाषा गुजराती आहे असेही त्यांनी नमूद केले.विद्याविहार, मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी महाराणा प्रताप, अहिल्यादेवी होळकर आणि जाम साहेब यांच्या कार्याचा उल्लेख केला. विशेष म्हणजे मंचावर महाराष्ट्राचे मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित होते.

जोशी यांच्या या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे, कारण सध्या मुंबई व महाराष्ट्रात मराठी सक्तीची मागणी जोर धरत आहे.



# अपहृत मुलगा ७ तासांत पोलिसांच्या ताब्यात

**परभणी । प्रतिनिधी**

शहरातून अपहृत १५ वर्षीय मुलाला नानलपेठ पोलीस आणि सायबर सेलने संयुक्त कारवाईत पुण्यातून अवघ्या ७ तासांत शोधून काढले. मंगळवारी (दि. ४) सायंकाळी शिकवणीसाठी गेलेला मुलगा घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला, परंतु तो सापडला नाही. बुधवारी (दि. ५) दुपारी नानलपेठ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंदवण्यात आला.

पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या आदेशानुसार स.पो.नि. सुशांत किनगे, पो.नि. शरद मरे, स.पो.नि. साईप्रकाश चन्ना आणि सायबर सेलच्या पथकाने तांत्रिक तपास केला. पुणे येथे मुलाचा ठावठिकाणा मिळाल्यानंतर रेल्वे पोलीस निरीक्षक खोपीकर यांच्या मदतीने संध्याकाळी ७ वाजता मुलाला सुखरूप ताब्यात घेण्यात आले.ही कारवाई पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व रेल्वे पथकाने केली. कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले.



# भिवंडीत महाराष्ट्रातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज मंदिर



**बदलापूर । प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर उभारण्यात येत असून, १७ मार्च २०२५ रोजी शिवजयंती दिनी या भव्यदिव्य मंदिराची प्राणप्रतिष्ठा आणि लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.या मंदिराची रचना गडकोट किल्ल्यासारखी असून, दीड एकर क्षेत्रात तटबंदी आणि भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आले आहे. तटबंदीखाली ३६ चबुतरे असून, त्यावर शिवरायांच्या ऐतिहासिक प्रसंगांचे देखावे साकारले जात आहेत.

अखंड कृष्णशिला काळ्या पाषाणातील ६ फूट उंच सिंहासनारूढ मूर्ती आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मूर्तिकार अरुण योगीराज यांनी साकारली आहे. मंदिरासोबतच येथे गुरुकुल पद्धतीने शिक्षण सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिवक्रांती प्रतिष्ठानच्या वतीने साकारलेले हे मंदिर शिवभक्तांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# सर्जा-राज्या हुर्रर..तुळशी वृंदावन यात्रेत शंकरपटाची धूम!

## हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत सरपंच अरविंद ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

**यवतमाळ । सुमित हेपट**

निसर्गरम्य मारेगाव तालुक्यातील नवरगाव येथे महाशिवरात्रीनंतर सहाव्या दिवशी पारंपरिक तुळशी वृंदावन यात्रेचे आयोजन करण्यात येते. या यात्रेत शंकरपट स्पर्धा विशेष आकर्षण असते, ज्यामुळे संपूर्ण विदर्भासह मराठवाडा आणि मध्य प्रदेशातून देखील बैलजोड्या आणि गाडे शर्यतीसाठी येथे दाखल होतात. यंदाच्या शंकरपटाचे उद्घाटन कुंभा येथील सरपंच अरविंद ठाकरे यांच्या हस्ते, अध्यक्षस्थानी संजय खाडे यांच्या उपस्थितीत मोठ्या जल्लोषात पार पडले.नवरगाव हे पुरातन परंपरा आणि धार्मिक महत्त्व असलेले गाव असून, येथे हेमाडपंथी नृसिंह मंदिर आणि शिवमंदिर आहेत. गावाच्या मध्यभागातून वाहणारी निर्गुडा नदी आणि त्यावर बांधलेले धरण परिसर नयनरम्य आहे. या गावाची ओळख पूर्वी बाजारपेठेमुळे होती, तर बैल बाजार आणि आठवडी बाजाराच्या प्रसिद्धीमुळे गावाचे वेगळे स्थान निर्माण झाले.

तुळशी वृंदावन यात्रेचा महाशिवरात्रीनंतर सहाव्या दिवशी प्रारंभ होतो. मागील तीन वर्षांपासून सरपंच अरविंद ठाकरे आणि देवस्थान कमेटीच्या प्रयत्नाने या यात्रेत शंकरपट स्पर्धेचे आयोजन सुरू करण्यात आले आहे. मागील दोन वर्षांत लाखोंच्या उपस्थितीने या स्पर्धेने विक्रम प्रस्थापित केला आहे.यंदाही ५ मार्चपासून शंकरपटास प्रारंभ झाला असून, ७ मार्चपर्यंत स्पर्धा रंगणार आहे. बैलगाडा शर्यतींसाठी संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे. अ गट आणि ब गट असे दुहेरी गटविभागन करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणावर बैलजोड्या सहभागी होत आहेत.यंदाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, तुळशी वृंदावन देवस्थान कमेटी, ग्राम पंचायत नवरगाव, करणवाडी, डोर्ली, हिवरी, टाकरखेडा आदींचे सहकार्य लाभले आहे. नियोजन समितीत शामराव उमरे, हरिभाऊ गायकवाड, अजय ठावरी यांचा महत्त्वाचा सहभाग आहे.यंदाच्या शंकरपटाच्या उद्घाटनावेळी सरपंच अरविंद ठाकरे यांचे वयोवृद्ध वडील वसंतराव ठाकरे यांचा उत्साह विशेष चर्चेचा विषय ठरला. बैलगाड्यांचा लळा आणि शंकरपटाच्या ओढीने ते पहाटेपासून तयारीत होते. घरातील सर्वांना लवकर उठवून त्यांनी नवरगावकडे ताफा हलवला.उद्घाटन होताच वसंतराव यांनी पहिली बैलगाडी हाकण्याचा प्रयत्न केला, मात्र आयोजकांनी त्यांच्या वयाचा विचार करून त्यांना दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी संधी देण्याचे कबूल केले. दिवसभर त्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. त्यांचे संपूर्ण आयुष्य बैलजोडी आणि गाड्यांच्या व्यवहारात गेले असून, बैलगाडा हाकण्याचा छंद त्यांनी अजूनही सोडलेला नाही. त्यामुळे त्यांना लवकरात लवकर संधी मिळावी, अशी मागणी चाहत्यांनी केली आहे.शंकरपटात बैलगाडा स्पर्धांचा थरार अनुभवण्यासाठी लाखो प्रेक्षक उपस्थित राहतात. यंदाही संपूर्ण विदर्भातून आणि शेजारील राज्यांतून स्पर्धक व प्रेक्षक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. बैलजोड्यांची वेगवान धाव, गाडीवाल्यांचा कसब, आणि जल्लोषाने भरलेला संपूर्ण परिसर - अशा उत्साही वातावरणात तुळशी वृंदावन यात्रेतील शंकरपट पुन्हा एकदा ऐतिहासिक ठरत आहे.



## ६ महिन्यांपासून वेतन नाही!

# जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयातील कंत्राटी सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

## १५ मार्चला 'भीक मांगो' आंदोलन; शासनाला इशारा

**चंद्रपूर । आशिष घुमे**

राज्यातील ग्रामीण आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये कार्यरत कंत्राटी सफाई कामगारांना मागील सहा महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. सततचा पाठपुरावा करूनही प्रशासन आणि कंत्राटदार कंपनीच्या निष्काळजीपणामुळे कामगारांचे हाल होत आहेत. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, १५ मार्च रोजी चंद्रपूरमध्ये गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान 'भीक मांगो' आंदोलन करण्यात येणार आहे.सहा महिन्यांपूर्वी राज्य शासनाने ग्रामीण आणि उपजिल्हा रुग्णालयांतील सफाईचे कंत्राट बाळासाहेब कदम यांच्या बीएसए कंपनीला दिले. तात्काळ काम सुरू करण्याचे आदेश मिळाल्यानंतर पूर्वीपासून कार्यरत सफाई कामगारांना पुन्हा रुजू करून घेण्यात आले. कंपनीच्या प्रतिनिधींनी कामगारांची नावे नोंदवून प्रत्यक्ष फॉर्म भरून घेतले, मात्र त्यानंतर कोणीही फिरकले नाही, ना वेतन मिळाले.

कामगार आपले वेतन कधी मिळणार याची उत्तरं शोधत कंत्राटदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे फिरत आहेत, मात्र त्यांना दिलासा मिळालेला नाही.



आम्ही रोज रुग्णालयं स्वच्छ ठेवतो, पण आमच्या घरात उपासमारीची वेळ आली आहे, असे कामगार सांगतात. शेवटी प्रदेश उपाध्यक्ष काँग्रेस कामगार कर्मचारी विभाग शेख जैरुद्दीन (छोटू भाई) यांना भेटून आपली व्यथा मांडली. त्यांनी हा प्रश्न चंद्रपूरचे पालकमंत्री, माजी पालकमंत्री विजय वडेट्टीवार, जिल्हाधिकारी चंद्रपूर सहाय्यक कामगार आयुक्त, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य उपसंचालक, सहायक यांच्यासमोर मांडला. यावर उपाय म्हणून जुन्या कंत्राटदाराला मुदतवाढ देऊन थकीत वेतन देण्यात यावे, असा आदेश जिल्हा शल्यचिकित्सकांना देण्यात आला आणि तसा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आला. मात्र, अद्याप कामगारांना वेतन मिळालेले नाही. या अन्यायाविरोधात १५ मार्च रोजी चंद्रपूरमध्ये गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान 'भीक मांगो' आंदोलन करण्यात येणार आहे. सफाई कामगार आपल्या कुटुंबांसह आंदोलनात सहभागी होणार असून, जमा झालेला पैसा जिल्हा शल्यचिकित्सक आणिजिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आरोग्य विभागाला सुपूर्द करण्यात येईल. या परिस्थितीतही शासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शेख जैरुद्दीन (छोटू भाई) यांनी दिला आहे. काम करूनही वेतनासाठी रस्त्यावर उतरावे लागणे, हा कामगारांसाठी मोठा अन्याय आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने लक्ष घालून सफाई कामगारांचे थकीत वेतन अदा करावे, अशी मागणी होत आहे.

### जगावे की मरावे? हतबल सफाई कामगार महिलेचा प्रश्न

**यावेळी एका कंत्राटी सफाई कामगार महिलेने आपल्या व्यथा 'सह्याद्रीचा राखणदार' समोर मांडताना अश्रू अनावर झाले. ती म्हणाली,किराणा दुकानदार उधारीवर सामान देत नाही, घरमालक भाडं न दिल्याने घर खाली करण्यास सांगतो. मुलांची परीक्षा फी भरण्यासाठीही पैसे नाहीत. आता आम्ही जगावे की मरावे?काम करूनही उपासमारीच्या उंबरठ्यावर उभे राहावे लागत असल्याने शासन आणि कंत्राटदार यांच्यावर संताप व्यक्त होत आहे. यासाठी शासनाने त्वरित वेतन अदा करावे, अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, अशी भूमिका कामगारांनी घेतली आहे.**

## डॉ.विखे पाटील आयटीआयला जिल्हास्तरीय क्रीडा महाकुंभ २०२५ मध्ये घवघवीत यश

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील पारंपारिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यभर क्रीडा महाकुंभ २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा सुरू झाली असून, यात पारंपारिक तसेच जागतिक स्तरावरील खेळांचा समावेश आहे.

डॉ. विखे पाटील आयटीआय, एमआयडीसी अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी या जिल्हास्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २ व ३ मार्च रोजी संस्थास्तरीय फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची ४ व ५ मार्च रोजी



अहिल्यानगर येथील शासकीय आयटीआयमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेत पंजा लढविणे या खेळात सचिन प्रशांत जाधव, दत्तात्रय यशवंत कराळे, ओंकार संतोष देवकाते आणि सिद्धार्थ विनायक रोकडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर लगोरी या स्पर्धेत सोमनाथ जवळे, तेजस लकडे, अमन शर्मा, प्रथमेश बेरड, संतोष शिंदे, धनंजय डोंगरे आणि अतुल येवले यांनी प्रथम पारितोषिक मिळवत नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. संस्थेचे प्राचार्य ए. व्ही. सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री व संस्थेचे चेअरमन नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, डायरेक्टर जनरल पी. एम. गायकवाड, डायरेक्टर डॉ. अभिजीत दिवटे आणि डायरेक्टर सुनील कल्हापुरे यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सेलडोह येथे वॉटरशेड यात्रेचे भव्य स्वागत

**सेलडोह । प्रतिनिधी**

मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वॉटरशेड यात्रेचे सेलडोह येथे भव्य स्वागत करण्यात आले.गावातून रथयात्रा काढण्यात आली, ज्याचे गावकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले. इंदिरा हायस्कूल, सेलडोहच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. ८वी वर्गाच्या विद्यार्थिनी चेतना माणिक देडे, श्रावणी संदीप मांडवकर, स्मिता संदीप मांडवकर यांनी पाणलोट विषयावर भाषण दिले तसेच गोंडी नृत्य सादर केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच रिणाताई तिवारी होत्या, तर प्रमुख पाहुणे




जलसंधारण अधिकारी बेन्द्रे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी पंचायत समिती सभापती जयश्री खोडे यांच्या हस्ते झाले.यावेळी माजी उपसरपंच मोरेश्वर मडावी, कृषी विभागाचे आर. टी. राऊत, विशाल बिरे, अनिल राठोड, कृषी सहायक आर. एस. घनबहादुर, कृषिमित्र राजू लाडीस्कर तसेच इंदिरा हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.

## व्यापाऱ्यावर हल्ला करून १४.५० लाखांची बॅग लुटली

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी-गंगाखेड महामार्गावर बोरवंड शिवारात दोन अज्ञात व्यक्तींनी व्यापारी रामनिवास शर्मा यांच्यावर हल्ला करून १४ लाख ५० हजारांची बॅग लुटून पळ काढला.

बुधवारी (दि. ५) रात्री आठच्या सुमारास शर्मा परभणीकडे जात असताना समोर कार आडवी लावून दोन तरुण उतरले व स्प्रे मारण्याचा प्रयत्न केला. प्रतिकार केल्यावर त्यांनी मारहाण करून बॅग हिसकावून गंगाखेडच्या दिशेने पलायन केले.घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, उपविभागीय अधिकारी चंद्रसेन देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. दैठणा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना झाली आहेत. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक अशोक जायभाये करीत आहेत.

## संगमनेरमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त भव्य क्रीडा स्पर्धांना उत्साहात सुरुवात

**संगमनेर । प्रतिनिधी**

एकविरा फाउंडेशनच्या वतीने महिला व युवतींसाठी टेनिस बॉल क्रिकेट आणि रस्सीखेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या प्रसंगी आ. डॉ. सुधीर तांबे, कांचनताई थोरात, नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे आणि आंतरराष्ट्रीय सायकलपटू कु. प्रणिता सोमण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.महिलांच्या आत्मविश्वास, संघभावना आणि नेतृत्वगुणांना चालना देण्यासाठी या स्पर्धा उपयुक्त ठरतील, असे मत दुर्गाताई तांबे यांनी व्यक्त केले. सशक्त महिला, सक्षम समाज या उद्देशाने आयोजित या स्पर्धेमुळे महिलांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळत आहे.




## उपनगरांसाठी नवीन भुयारी गटार योजना-यशवंत डांगे




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा अंतिम टप्प्यात असून, लवकरच तो कार्यान्वित होणार आहे. तसेच उपनगरांसाठी ६१७ कोटी रुपयांची नवीन गटार योजना राबविण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.केडगाव, आगरकर मळा, कल्याण रोड, बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगर, छत्रपती संभाजीनगर रस्ता, मुकुंदनगर आणि गोविंदपुरा परिसरात ६७२ किमी लांबीची ड्रेनेज लाईन, तीन पंपिंग स्टेशन आणि १८ एमएलडी क्षमतेचा मलनिस्सारण प्रकल्प प्रस्तावित आहे. हा आराखडा लवकरच राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे.

## श्रीक्षेत्र गोळवाडी येथे ज्ञानेश्वरी पारायण वाचन सुरू



**वैजापूर । प्रतिनिधी**

गोळवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर व ओमकारेश्वर मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त ज्ञानेश्वरी पारायण वाचन सुरू असून, ह.भ.प. पांडुरंग महाराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अकरावा अध्याय 'विश्वरूपदर्शन' सादर करण्यात आला.

या पारायण वाचनात अर्जुन शिंदे, आसाराम मांजरे, वाकचौरे , राधा मिसाळ, खुशी पगार, जयश्री पगार, राधा साळुंखे, भक्ती पवार, चंचल बनकर, सायली आदी सहभागी झाले आहेत. या उपक्रमामुळे हिंदू संस्कृतीचे संस्कार पुढील पिढीवर होत असून, ग्रामस्थांनी सर्व वाचक मंडळींचे अभिनंदन केले.

## शिवसेना महिला आघाडीची कोल्हार बस स्थानकाच्या सुविधांसाठी निवेदन देऊन मागणी




**कोल्हार । प्रतिनिधी**

पुणे स्वारगेट बसस्थानकातील घटनांच्या पार्श्वभूमीवर कोल्हार बसस्थानकात सुरक्षेच्या दृष्टीने सुधारणा करण्यासाठी शिवसेना महिला आघाडीने अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

महिलांसाठी सुरक्षित स्वच्छतागृह, हिरकणी कक्ष, अपंगांसाठी सुलभ प्रवेशव्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, संध्याकाळी ५ नंतर बाहेरून येणाऱ्या बसना स्टॉपवर वळवणे, विद्यार्थ्यांच्या गैरसोयी टाळण्यासाठी सकाळी ९ पूर्वी बससेवा सुधारणे आणि पोलीस गस्त वाढवणे यासारख्या मागण्या करण्यात आल्या.यावेळी शिवसेना महिला आघाडी उत्तर अहिल्यानगर जिल्हा प्रमुख सुनिता शेळके, तालुका प्रमुख अर्चना निबे, शहर प्रमुख पूजा सोमवंशी, उपशहर प्रमुख कावेरी राऊत तसेच शिवसैनिक शोभा गाडे उपस्थित होत्या.

## चिखली शाळेत विद्यार्थी अनुशासन दिन उत्साहात साजरा



**मोहोळ । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखली (ता. मोहोळ) येथे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक विष्णु दाढे यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवस शाळा चालवून विद्यार्थी अनुशासन दिन साजरा केला.विद्यार्थ्यांनी पहिली ते सातवीच्या वर्गांना शिकवण्याचा अनुभव घेतला. श्रवण यादव याने मुख्याध्यापकाची, तर मानवी शिरसट हिने उपमुख्याध्यापिकेची जबाबदारी पार पाडली. याप्रसंगी राजेंद्र बनसोडे, वर्गशिक्षक भिमाशंकर राशीनकर, मालन चेंडगे, रवि चव्हाण, अर्चना घुगे, दगडू सरक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी एकदिवसाच्या अध्यापनाचा व वर्ग नियंत्रणाचा अनुभव सांगून उपक्रमाची सांगता झाली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .